# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूरकर पाचवा



कोल्हापूर : नाशिक येथील पंचवटी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय खुल्या क्लासिकल रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाचा बी.कॉम. भाग- १ मधील विद्यार्थी ऋषीकेश कबनूरकरने उल्लेखनीय कामगिरी केली. आठ फेऱ्यांत खेळताना दुसऱ्या बोर्डवर ७ गुणांची कमाई करून खुल्या गटात पाचवा क्रमांक पटकावून त्याने ५१.६ रेटिंगची भर घातली.

या स्पर्धेत फिडे मानांकित ९१ सह २३६ खेळाडूंनी सहभाग घेतला. ऋषीकेश हा दाभोळकर कॉर्नर येथील अनुज ॲकॅडमीत सराव करतो. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• शुक्रवार
दि. २१ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजचा पुण्यात सन्मान

## एन.एस.एस. मार्फत पूरग्रस्तांना भरीव मदत केल्याची घेतली दखल

**जनप्रवास : कोल्हापूर**

संकटातून संकल्पाकडे यानुसार विवेकानंद कॉलेजमधील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. विभागामार्फत पुरग्रस्तांना भरीव मदत करण्यात आली होती. या बद्दल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांचे हस्ते मॉडर्न कॉलेज, पुणे येथे विवेकानंद कॉलेजचा सन्मान करण्यात आला.




पुरग्रस्तांनाभरीव मदत केल्यापद्दल मंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते सन्मान स्विकारताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात आदी.

अतिवृष्टीने मराठवाडा विभाग व सोलापूर जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले होते. या परिस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत विवेकानंद कॉलेजने पुरग्रस्तबाधित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा दत्तक घेतले. विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान त्याचप्रमाणे समाजाला पुन्हा उभारी देण्यासाठी महाविद्यालयाच्या सर्व घटकांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाने पुरग्रस्तांना मदतीसाठी केलेल्या आवाहनानुसार शैक्षणिक साहित्य, कपडे व प्रवास खर्चासाठी विद्यार्थ्यांच्या खात्यावर रोख रक्कम, खाद्य पदार्थ व आर्थिक मदतीव्दारे संकलीत करुन दत्तक दिलेल्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथे मदत पोहोचवण्यात आली. शिक्षक, प्रशासकीय सेवक व स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या योगदानामुळे विवेकानंद कॉलेजचा उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत संकटातून संकल्पाकडे या कार्यक्रमात स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ संदीप पाटील, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. पी. आर. बागडे, डॉ. ए. एस. महात यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या उपक्रमासाठी शिक्षक, प्रशासकीय सेवक, सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.

Sthorat-
21-11-2025